# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.12.2024** **वार – रविवार**

---

**लष्करी सराव**

भारत कंबोडिया दरम्यानचा संयुक्त लष्करी सराव हा दहशतवादाचा मुकाबला करण्याच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल. या सरावामुळे दोन्ही लष्करात समन्वय निर्माण होईल असं प्रतिपादन ब्रिगेडियर एस तालुजा यांनी व्यक्त केलं. भारत कंबोडिया दरम्यानच्या cinbax या संयुक्त लष्करी सरावाला आज पुण्यात सुरुवात झाली. येत्या 8 डिसेंबर पर्यंत चालणाऱ्या या सरावात दोन्ही लष्करातील प्रत्येकी 20 जवान सहभागी होत आहेत. उद्घाटन समारंभाला कंबोडिया लष्कराचे कमांडर कॉल होय उपस्थित होते.

**पुस्तक महोत्सव**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं येत्या 14 ते 22 डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणात पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. या महोत्सवाअंतर्गत 11 तारखेला 'शांतता, पुणेकर वाचत आहेत’ हा उपक्रम होणार आहे; यामध्ये दुपारी 12 ते 1 या वेळेत प्रत्येकानं आपल्या आजूबाजूला उपलब्ध असलेलं पुस्तक वाचावं आणि इतरांनाही प्रेरणा द्यावी असं आवाहन महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी आज केलं.

**पुणे मनपा**

पुणे महापालिकेनं कोट्यवधी रुपये खर्च करून बसवलेली एटीएमएस ही सिग्नल यंत्रणा निरुपयोगी ठरली असल्याचं पुणे पोलिसांनी म्हटलं आहे.

या यंत्रणेमुळे वाहतूक कोंडी वाढत आहे; या प्रणालीचं काम सुधारल्याशिवाय संबंधित कंपनीला उर्वरित पैसे देऊ नये, असं पत्र पुणे पोलिसांनी महापालिकेला पाठवलं आहे. पुण्यातील वाहतूक नियंत्रित करण्यासाठी पुणे स्मार्ट सिटी कंपनीनं 'एटीएमएस' यंत्रणा बसवण्यासाठी 2018 मध्ये निविदा काढल्या होत्या. या यंत्रणेसाठी 102 कोटी रुपये आणि देखभाल-दुरुस्तीसाठी 58 कोटी रुपये खर्चाच्या निविदेला पुणे महापालिकेनं मान्यता दिली होती.

**रेल्वे**

आगामी महापरिनिर्वाण दिनानिमित्त होणारी गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेच्या मुंबई, भुसावळ, नागपूर, पुणे आणि सोलापूर विभागातल्या काही प्रमुख स्थानकावर 2 ते 9 डिसेंबर दरम्यान फलाट तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. फलाटावर होणारी गर्दी नियंत्रण करण्यासाठी तसंच स्थानक परिसरात प्रवाशांची संख्या नियंत्रित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. जेष्ठ नागरिक आणि वैद्यकीय गरजा असलेल्या लोकांना या निर्बंधामधून सवलत देण्यात आली आहे.

**दूध उत्पादक**

दूध उत्पादकांना अनुदान देण्यासाठी राज्य सरकारकडून 267 कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे; त्यानंतर आता ऑक्टोबर अखेरपर्यंतचं अनुदान वितरित केलं जाणार असल्याची माहिती पुणे दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे आयुक्त प्रशांत मोहोड यांनी दिली. यासाठी संबंधित संस्थांनी तातडीनं प्रस्ताव सादर करावेत असं ते म्हणाले.

**प्रकाशन**

कवीवर्य राजा बढे यांचा कला, लेखनाचा समर्थ वारसा बढे कुटुंबीय पुढे चालवत आहेत, असं प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक अरविंद नेरकर यांनी केलं. ते काल पुण्यात उषा बढे यांच्या "या वळणावर " या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी बोलत होते.

**बाजार**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. शेवग्याला आज उच्चांकी भाव मिळाला; तर पालेभाज्यांमध्ये शेपू, कांदापात यांच्या भावात घसरण झाली. थंडीला सुरुवात झाल्यानं फळ बाजारात बोरांची आवक वाढली असून उमरान आणि चमेली जातीच्या बोरांना चांगली मागणी असल्यानं भाव वाढ झाली. लग्नसराईच्या हंगामामुळे फुल बाजार तेजीत असला तरी सुट्ट्या फुलांचे भाव घसरले आहेत.

**मॅरेथॉन**

आठव्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेवर इथिओपियाच्या धावपटूंनी आपलं वर्चस्व कायम राखलं. आज पहाटे तीन वाजल्यापासून ही स्पर्धा सुरू झाली. पूर्ण मॅरेथॉनमध्ये पुरुष गटात असेफा आयेलंच विजेता ठरला. तर भारतीय गटात उत्तर प्रदेशाचा ग्यानबाबू अव्वल आला. नाशिकचे कमलाकर देशमुख दुसऱ्या आणि गणेश बागुल तिसऱ्या स्थानावर राहिले. पुरुषांच्या अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत भारताचा हरीश विजेता ठरला. महिलांच्या पूर्ण मॅरेथॉन स्पर्धेत इथिओपियाची निगाटू बसाझिन प्रथम आली. भारतीय गटात महाराष्ट्राची अश्विनी जाधव विजेती ठरली तर महाराष्ट्रातील राष्ट्रीय खेळाडू ज्योती गवते हिला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं.

महिलांच्या अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत भारताची साक्षी जद्याल विजेती ठरली. अभिनंदन सूर्यवंशी आणि रिया धोत्रे यांनी दहा किलोमीटर गटात, सौरभ मेहरा आणि मानसी यादव यांनी पाच किलोमीटर प्रकारात तर व्हीलचेअर गटात सोमनाथ जाधव आणि भाग्यश्री माझीरे विजेते ठरले. स्पर्धेतील विजेत्यांना महापालिकेकडून 35 लाख रुपयांची पारितोषिकं देण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 29 तर किमान 13 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या दुपारनंतर हवामान अंशतः ढगाळ राहून किमान तापमान 15 अंशांच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.